# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, सोलापूर

**(गृह शाखा)**

**दुरध्वनी क्रमांक** - 0217- 2731020 **ई मेल** - dcbsolapur@gmail.com

---

वाचा :- १) भारतीय साथरोग प्रतिबंध कायदा १८९७

२) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५

३) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र. कोरोना २०२०/प्र.क्र. ५८/ आरोग्य-५ दि. १४ मार्च, २०२०.

४) महाराष्ट्र शासन गृह विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील क्र.आरएलपी-१२२१/प्र.क्र.२८१/विशा १ब दि.२९.१२.२०२१

---

जा.क्र. २०२१/डिसीबी/०२/आरआर/७२२७ दिनांक :-३०/१२/२०२१

**विषय - ३१ डिसेंबर, २०२१ वर्ष अखेर व नूतन वर्षारंभ,२०२२ मार्गदर्शक सूचना**

**आदेश**

ज्याअर्थी, कोरोना विषाणूच्या संक्रमणाच्या पार्श्वभुमीवर गेल्या काही दिवसांमध्ये " ओमिक्रॉन " ही नवीन विषाणू प्रजाती आढळून आल्यामुळे संसर्गाचा नवीन धोका निर्माण झाला आहे. या ओमिक्रॉन विषाणू प्रजातीचे संक्रमण सामान्य नागरिकांमध्ये/रहिवाशांमध्ये फार मोठया तीव्रतेने पसरण्याची दाट शक्यता आहे. या पार्श्वभुमीवर नागरिकांनी आरोग्याच्या दृष्टिने खबरदारी म्हणून मोठया प्रमाणात एकत्र न येता या वर्षी ३१ डिसेंबर,२०२१ (वर्ष अखेर) व नूतन वर्ष २०२२ चे स्वागत अत्यंत साधेपणाने करणे अपेक्षित आहे. यानुषंगाने गृह विभाग, महाराष्ट्र शासन यांनी वरील वाचा क्रं.४ अन्वये ३१ डिसेंबर,२०२१ (वर्ष अखेर) व नूतन वर्ष २०२२ चे स्वागत करणेबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

त्याअर्थी, मी मिलिंद शंभरकर, जिल्हादंडाधिकारी, सोलापूर, फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) (३) व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सोलापूर जिल्ह्यात (पोलीस आयुक्तालय सोलापूर ची हद्द वगळून) सार्वजनिक हिताच्या दृष्टीने यावर्षी सुध्दा खबरदारीचा उपाय म्हणून ३१ डिसेंबर,२०२१ (वर्ष अखेर) व नूतन वर्ष २०२२ चे स्वागत करणेकामी खालीलप्रमाणे सूचना/आदेश जारी करीत आहे.

१. कोरोनाच्या अनुषंगाने दि.३१ डिसेंबर,२०२१ रोजी व दि.१ जानेवारी,२०२२ रोजी नववर्ष स्वागताच्या निमित्ताने नागरिकांनी घराबाहेर न पडता नववर्षाचे स्वागत शक्यतोवर घरीच साधेपणाने साजरे करावे.

२. मदत व पुनर्वसन विभाग,मंत्रालय,मुंबई यांच्या उपरोक्त दि.२४.१२.२०२१ रोजीच्या आदेशान्वये राज्यात दि.२५ डिसेंबर २०२१ पासून रात्री ९:०० ते सकाळी ६:०० वाजेपर्यंत ५ पेक्षा अधिक व्यक्तींनी एकत्र येण्यावर बंदी घालण्यात आली आहे,सदर आदेशांचे पालन करण्यात यावे.

३. कोवीड-१९ च्या संसर्गजन्य परिस्थितीचा विचार करता महाराष्ट्र शासन महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाचे परिपत्रक क्र.DMU/२०२०/CR-९२/DisM-१, दि.२७.११.२०२१ अन्वये देण्यात आलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करावे. तसेच शासन आदेश मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय मुंबई क्र. DMU/२०२०/CR-९२/DisM-१, दि.२४ डिसेंबर,२०२१ अन्वये देण्यात आलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करावे.

४. दि.३१ डिसेंबर,२०२१ व नूतन वर्ष,२०२२ चे स्वागताकरिता आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमांना बंदिस्त सभागृहात उपलब्ध आसनक्षमतेच्या ५०% पर्यंत तर खुल्या जागेत आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमांना उपलब्ध क्षमतेच्या २५% च्या मर्यादेत उपस्थित राहण्यास परवानगी असेल.

५. सदर ठिकाणी कोणत्याही प्रकारे गर्दी होणार नाही व Social Distancing राखले जाईल तसेच मास्क व सॅनिटायझरचा वापर होईल याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे.तसेच त्या ठिकाणी निर्जंतूकीकरणाची व्यवस्था करण्यात यावी.

६. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर ६० वर्षावरील नागरिकांनी व दहा वर्षाखालील मुलांनी सुरक्षिततेच्या व आरोग्याच्या दृष्टिने शक्यतोवर घराबाहेर जाणे टाळावे.



Scanned with CamScanner

७. ३१ डिसेंबरच्या दिवशी नागरीकांनी बागेत,रस्त्यावर अशा सार्वजनिक ठिकाणी मोठया संख्येने येऊन गर्दी न करता सोशल डिस्टन्सींग (सामाजिक अंतर) राहील तसेच मास्क व सॅनिटायझरचा वापर होईल याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे.

८. नववर्षाच्या स्वागताच्या निमित्ताने कोणत्याही प्रकारे धार्मिक/सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करु नये तसेच मिरवणूका काढण्यात येऊ नयेत.

९. नूतन वर्षाच्या पहिल्या दिवशी बहुसंख्या नागरिक धार्मिक स्थळी जात असतात. अशावेळी त्या ठिकाणी एकाच वेळी गर्दी न करता सोशल डिस्टन्सींगचे पालन करावे.तसेच संबंधितांनी आरोग्य व स्वच्छतेच्या दृष्टिकोनातून योग्य त्या खबरदारीच्या उपाययोजना कराव्यात.

१०. फटाक्यांची आतिषबाजी करण्यात येऊ नये. ध्वनीप्रदुषणाच्या अनुषंगाने नियमांचे काटेकोरपणे पालन व्हावे.

११. कोविड-१९ व विशेषत्वाने ओमिक्रॉन या विषाणू प्रजातीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाच्या नगरविकास विभाग, मदत व पुनर्वसन, आरोग्य,पर्यावरण,वैद्यकीय शिक्षण विभाग तसेच संबंधित महानगरपालिका, पोलीस, स्थानिक प्रशासन यांनी विहीत केलेल्या नियमांचे काटेकोर अनुपालन करणे बंधनकारक राहील.

१२. तसेच या परिपत्रकानंतर ३१ डिसेंबर,२०२१ व नूतन वर्ष,२०२२ सुरु होण्याच्या मधल्या कालावधीत काही सूचना नव्याने प्रसिध्द झाल्यास त्यांचे देखील अनुपालन करावे.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती/ संस्था अथवा संघटना यांचेवर भारतीय दंड संहिता (४५ ऑफ १८६०) कलम १८८ मधील तरतूदीनुसार दंडनिय/ कायदेशीर कारवाईस पात्र असून आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५, साथ रोग नियंत्रण कायद्यातील तरतूदी आणि इतर कायदे आणि विनियम यानुसार कारवाई करणेत येईल. अशा व्यक्ती, संस्था अथवा संघटना यांचे विरुद्ध संबंधित पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी यांनी कारवाई करावी.

सदरचा आदेश दि.३०.१२.२०२१ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला असे.

(मिलिंद शंभरकर)
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**सोलापूर**

**प्रत– माहितीस्तव सादर**

१. मा.अपर मुख्य सचिव, गृह विभाग (विशेष) मंत्रालय, मुंबई-३२.
२. मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे

**प्रत – आवश्यक कार्यवाहीस्तव :-**

१. पोलिस आयुक्त सोलापूर शहर
२. आयुक्त, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर
३. पोलीस अधिक्षक, सोलापूर ग्रामीण
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर
५. अधिष्ठाता,डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैदयकिय महाविद्यालय सोलापूर.
६. जिल्हा शल्य चिकीत्सक, सोलापूर
७. जिल्हा प्रशासन अधिकारी, नगरपालिका शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर
८. सर्व उपविभागीय दंडाधिकारी ---------------
९. सर्व तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी ------------
१०. सहायक कामगार आयुक्त, सोलापूर
११. जिल्हा माहिती अधिकारी सोलापूर
१२. केंद्र संचालक आकाशवाणी केंद्र सोलापूर यांना प्रसिध्दीस्तव.
१३. राष्ट्रीय सुचना-विज्ञान केंद्र (NIC) जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर
१४. सर्व मुख्याधिकारी, न.पा.,नगरपरिषद --------------------

E:\E DRIVE\DCB-2\2019-2020\Corona

Scanned with CamScanner